# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-13.05.2026** **वार- बुधवार**

---

**पिकस्पर्धा**

२०२५ च्या खरीप हंगामातील भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग आणि सुर्यफुल या ११ पिकांसाठी राज्य पातळीवरील घेतलेल्या पीकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते झाले आहेत. पुणे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे पुणे यांनी ही माहिती दिली.

स्पर्धेत भाग घेतलेल्या पिकाची उत्पादकता तालुक्याच्या त्या पिकाच्या सरासरी उत्पादकतेच्या दीडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांना पीक स्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येतं.

या स्पर्धेत सोयाबीन पिकासाठी आदिवासी गटात ओतूरच्या भाऊ वारे यांना प्रथम क्रमांक मिळाला. द्वितीय क्रमांक आलमे गावातल्या रामचंद्र कातवारे यांना तर तृतीय क्रमांक कमान गावच्या अशोक नाईकरे यांना मिळाला.

सुर्यफुल पिकासाठी सर्वसाधारण गटात बारामती तालुक्यातील नारायण लोणकर आणि पांडुरंग वाबळे यांना प्रथम क्रमांक मिळाला.

भात पिकासाठी आदिवासी गटात प्रथम क्रमांक आंबेगावचे लक्ष्मण लोहकरे यांना तर बाजरी पिकासाठी सर्वसाधारण गटात तृतीय क्रमांक शिरुर तालुक्यातील रायचंद शिंदे यांना मिळाला.

**हॅकेथॉन**

पुणे ॲग्री हॅकॅथॉन-२०२६ या स्पर्धेचं कृषी महाविद्यालय परिसरात १५ ते १७ मे या कालावधीत आयोजन करण्यात येणार असून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा,असं आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केलं आहे. या स्पर्धेत मृदा आरोग्य आणि व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन आणि ऑटोमेशन, शेती यांत्रिकीकरण, कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी, अक्षय ऊर्जा आणि कृषी-कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कीड व्यवस्थापन, हवामान-अनुकूल आणि डिजिटल शेती, प्रभावी कृषी प्रशासनासाठी एआय, तंत्रज्ञान आधारित हस्तक्षेप प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पीक नुकसानाचे मूल्यांकन आणि भाकितासाठी एआय, तंत्रज्ञान, साधनं या विषयाशी निगडित नवकल्पना, उत्पादनं  असणार आहेत.

**ऊर्जा**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा बचतीसाठी राबवण्यात येणारे उपक्रम हे केवळ अभ्यास, अहवाल आणि सादरीकरणांपुरते मर्यादित राहू नयेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीतून वीज वापरात लक्षणीय बचत आणि कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापनाचे ठोस परिणाम दिसून येणं गरजेचं आहे असं आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी म्हटलं आहे. महापालिकेच्या इमारतींमधल्या ऊर्जा बचत धोरणांबाबतच्या बैठकीत ते बोलत होते.

**काटकसर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटकसर करण्याचं आवाहन केल्याच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक बैठक घेतली. या बैठकीत सर्व मंत्र्याच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याबाबत विचार करण्यात आला. सुरक्षिततेशी तडजोड न करता मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनसंख्येवर मर्यादा आणली जाणार आहे.

**आयातमूल्य**

केंद्र सरकारनं सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात केलेली वाढ आजपासून लागू झाली. सोने आणि चांदी या धातूंवर ५ टक्के शुल्क आकारलं जाईल, तर प्लॅटिनमच्या काही घटकांसाठी ५ पूर्णांक ४ दशांश टक्के शुल्क लागू होईल. परकीय चलन वाचवण्यासाठी इतर उपाययोजनांबरोबरच सामाजिक कल्याण अधिभार तसंच पायाभूत सुविधा आणि कृषी अधिभार वाढवल्याचं अर्थमंत्रालयानं जाहीर केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**सीबीएई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत ८५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्यावर्षीच्या तुलनेत निकालात घट झाली आहे. मुलींच्या उत्तीर्णाचं प्रमाण ८८ टक्के तर मुलांमध्ये हे प्रमाण ८२ टक्के आहे.

**भिंत**

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील मोटेवाडी आसंगी तुर्क इथल्या मरगुबाई यात्रेदरम्यान काल सहा भाविकांचा मृत्यू झाला. अचानक आलेल्या पावसामुळं हे भाविक भिंतीच्या आडोशाला बसले असता भिंत कोसळली. भाविकांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**12 सातारा 13**

सातारा शहरासह तालुका आणि इतर भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसानं झोडपून काढण्यास सुरुवात केली आहे. या पावसामुळं वाढलेल्या उष्णतेपासून हैराण झालेल्या नागरिकांची सुटका होण्यास मदत झाली असून आंबा आणि इतर फळपिकांचं मोठं नुकसान झाल्याची शक्यता आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उन्हाची काहिली होत आहे. कमाल तापमान 42 अंश तर किमान 25 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.